# परिपाठ गुच्छ

## (धार्मिक, नित्यपाठ, आरती व संस्कृत स्तोत्रादि)

**# संपादन #**

**ब्र. विद्युल्लता शहा,**

**सोलापूर.**



| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| प्रथम आवृत्ती | : | १९९१ | प्रती | : | १००० |
| द्वितीय आवृत्ती | : | १९९६ | प्रती | : | १००० |
| तृतीय आवृत्ती | : | २००१ | प्रती | : | २००० |

प्रकाशिका

सुश्री. विद्युल्लता शहा.

क्षु.रा.दि.जैन श्राविकाश्रम सोलापूर - २.

★★★★

( प्राप्तिस्थान )

क्षु.रा.दि. जैन श्राविकाश्रम,

फोन नं. - ३२६२९३ सोलापूर- ४१३००२ (महाराष्ट्र)

★★★★

( सर्वाधिकार )

क्षु.रा.दि. जैन श्राविकाश्रम,

सोलापूर - ४१३००२ (महाराष्ट्र)

★★★★

( मुद्रणस्थळ )

श्राविका मुद्रणालय,

पं. सुमतीबाई शहा पथ, श्राविका चौक,

बुधवार पेठ, सोलापूर - २.

★★★★

( प्रकाशकीय )

बालपणी कोमल तरुतुल्य बुध्दी बाके्ल,

घेईल ज्या तो गुण मति वेढूनी टाके्ल ॥

या सुभाषिताची सार्थ-साक्ष (वसतीगृहांतील) आश्रमीय जीवनाचे क्षण वेचलेल्या प्रत्येकीला मिळते. प्रातःकाली मंगल प्रार्थनेचे सुमधुर निनाद, पावन णमोकार मंत्राचा ध्वनी साखरझोपेतून जागे होताच वातावरणातून घुमून एक प्रकारचा आगळा परिमल दिवसभर दरवळत राहातो, मन प्रसन्न राहून विद्याध्ययनाला हुरुप चढतो. सायंकालीन भ. महावीरांची भजने, आरती सामायिक स्तवनांजलीयांची सामूहिक पाठांची पर्वणी या जीवनांत अविस्मरणीय ठसे उमटविते, प्लॅस्टिकच्या युगात मन प्लॅस्टिक इतके्च लवचिक होऊन त्याला द्यावा तसा आकार घेऊन सुसंस्कारक्षम व्हावे यासाठीच या परिपाठ गुच्छचा प्रपंच मांडला, भक्तीचे सामर्थ्य अपार आहे. बाळकडूमुलीनी रोज घेऊन जीवनात अनंद मिळवावा.

या शुभेच्छासह !

( ब्र. विद्युल्लता शहा)

## ( चोवीस जिनेश्वर आरती )

जय जय आरति सुरनर किन्नर वर्तमान चरणी,
वर्तमान चरणी ।
भावे धरुनी निज मन आरति आनंदे करुनी ॥

कैलास गिरीवर आदिजिनेश्वर मोक्षासी गेले ।
अजित, संभव, अभिनंदन हे शिखरावरि आले ॥

सुमति, पद्मप्रभु देव सुपार्श्व, चंद्रनाथ मिळले ।
पुष्पदंत, शीतल श्रेयांस एकादश झाले ॥

चंपापुरी वासपूज्य मुक्तिचे कांत ।
विमल, अनंत, धर्मनाथ सम्मेद शिखरात ॥

शांति, कुंथु, अरहनाथ, अठरा देषरहित ।
मल्ली, मुनिसुव्रत, जय नमी, आत्मभाव सहित ॥

गिरनारावर नेमी जिनेश्वर उग्र तपोधारी ।
पार्श्वनाथ ज्ञानसहित शिखरा अधिकारी ॥

पावापुरी महावीर जिनेश्वर बालब्रम्हचारी ।
पूर्ण आरती टोक स्थानी दास विनंती करी ॥

## ( पसायदान शान्तिपाठ )

असो सुरवरित कल्याण

जनतेचे जगी सदा।

धर्मशील असो विश्वी

भूमिपाल समर्थही ॥ १ ॥

होवो वृष्टी यथाकाली

पर्ययाची जगी सदा।

न राहो दु:ख विश्वात

रोगराई नि आपदा ॥ २ ॥

नसो या जगतामाजी

चोरी मारी कदापिही।

नसो दुर्भिक्ष टंचाई

जीवलोकी कशाचिही ॥ ३ ॥

अहिंसाधर्म चक्राचे

होवो नित्य प्रसारण।

मिळो संतोष आनंद

सकला सौख्य साधन ॥ ४ ॥

नांदो विश्वी सदा शांती

सामंजस्य सहिष्णुता।

मैत्री भाव सामानत्व

सत्यनिष्ठा दया क्षमा ॥ ५ ॥

प्राचार्य विद्याधर उमाठे

श्रेयस, सर्व सेवा संघ कॉलनी,

मगनवाडी, वर्धा - ४४२००१

## ( श्री सिध्दचक्राची आरती )

जय सिध्दचक्रदेवा जय सिध्दचक्रदेवा ।
करिती तुमची निशिदिनि सुरनर सुमने मुनिसेवा ॥ १ ॥
ज्ञानवरणादिक कर्माष्ट कनेले विलयास ।
वन्दन करिती नागनरामर तुमच्या पायास ॥ २ ॥
ज्ञान नि दर्शन सुख बल तुमचे अनन्तता धरिती ।
सूक्ष्म, अगुरुलघु, अवगाहन ही अबाधता वरिती ॥ ३ ॥
उदेह आपण शुध्द चिन्मय स्वागत रतभोगी ।
तुम्हां जपती सूरि नि पाठक सदैव मुनि योगी ॥ ४ ॥
तुम्हा ब्रम्हा हरि हर सुरपति गणेश हे ध्याती ।
पदाब्ज-सेवनि भव्य श्रृंग हे गुंग सदा होती ॥ ५ ॥
संकट-हरणा अधमोध्दरणा भवसागर-रणा ।
अष्टकर्म-रिपुहरा आमुच्या जन्मजरा-मरणा ॥ ६ ॥
डाकिनी शाकिनि भूत पिशाची व्यंतर उपसर्गं ।
नाम-चिंतने क्षणांत पळती तरती जन दुर्ग ॥ ७ ॥
दीन नि दु:खी दुबळे निंर्धन जे नाना रोगी ।
शुध्द सिध्दचक्राते ध्यातां होती सुखभोगी ॥ ८ ॥
वनाग्नि जल अरि पर्वत विषधर सिंह नि घोर रण ।
सिध्दचक्रहे हरिते यांचे भव करिता स्मरण ॥ ९ ॥
मदनसुंदरी करिती झाली सुसिध्दचक्राचे ।
पूजन नन्दीश्वर-पर्वामधि आठ दिनी साचे ॥ १० ॥
तिच्या पतीचा कुष्ठ नि त्याच्या मित्रांचा गेला
भवसिन्धुतुनि तरुनि तिचा पती मुक्तिसुखी झाला ॥ ११ ॥
कार्तिक फाल्गुन आषाढाच्या आठ दिनी पूजा ।
श्रीसिध्दांची करितो नर तो हरितो भववीजा ॥ १२ ॥

( भजन )

श्री सिध्दचक्रका पाठ करो दिन आठ, ठाठसे प्राणी,

फल पायो मैना रानीं । टेक ।

मैना सुंदरि इक नारी थी, कोढी पति लखि दु:खियारी थी ।

नहि पडे चैन दि रैन व्यथित अकुलानी ॥ फल पायो ॥

जो पतिका कष्ट मिटाऊँगी, तो उभयलोक सुख पाऊँगी ।

नहि अजागलस्तनवत निष्फल जिन्दगानी ॥ फल पायो ॥

इक दिवस गई जिनमन्दीर मे,दर्शन करि अति ह्र्षी उर में ।

फिर लखए साधु निरग्रन्थ दिगम्बर ॥ फल पायो ॥

बैठी मुनि को कर नमस्कार, निज निंन्दा करती बारबार ।

भरि अषूनयन कही मुनि सों दु:खद कहानी ॥ फल पायो ॥

बोले मुनि पुत्री धैर्य धरो, श्री सिध्दचक्रका पाठ करो ।

नहि रहेगी कुष्ठ की तन में नामनिशानी ॥ फल पायो ॥

सुनि साधु वचन हर्षी मैना, नहिं होय झूठ मुनि केबैन

कर के श्रध्दा श्री सिध्दचक्रकी ठानी ॥ फल पायो ॥

जब पर्व अठाई आया है, उत्सवयुत पाठ कराया है ।

सब केतन छिडका यंत्र न्हवनका पानीं ॥ फल पायो ॥

गन्धोदक छिडकत वसुदिन में, नहिं रहा कुष्ठ किंचित तनमें ।

भई सात शतक की काया स्वर्णसमानी ॥ फल पायो ॥

भव भोग भोंगि योगेश भये, रीपाल कर्म हनि मोक्ष भये ।

दूजे भव मैना पावे शिवरजधानि ॥ फल पायो ॥

जो पाठ करे मनवचतनसे, वे छूटि जाय भवबन्धन से ।

मक्खन मत करो विकल्प कहा जिनवाणी ॥ फल पायो ॥

( पवित्र-पर्युषण-पर्व )

(१)

जय पर्युषण सर्व महान्,

स्वागत करु या थोर लहान ॥ धृ ॥

जागृतिच्या शुभ संदेशाने, भरले पूर्ण वितान ।

हृदय सागरी अपुल्या आले, आनंदास उधान ॥

पावित्र्याच्या वातावरणी, सर्व करु सन्मान ॥ १ ॥

सम्यक्‌दर्शन पूज्य असे ते, दिधले जगता दान ।

आत्म्याला जे जाणिल ऐसे, दिधले जीवा ज्ञान ॥

दिधले त्या चारित्र्या होते, आत्म्यातच रममाण ॥ २ ॥

क्रोधाच्या प्रलयास भलेथे, मान जाहला म्लान ।

माया नगरी लोप पावले, लोभा न मिळे स्थान ॥

सर्व रमू या शांति सुखात, होता अमृत पान ॥ ३ ॥

(२)

समजावुनी मनाते, दे आत्मधर्म माते ।

पर्वास मागणे हे न रुचो रुची मनाते ॥ १ ॥

पडताळूनी पहावा, मत्पाप पुण्य खाते ।

घडले न सार्थ म्हणुनी, मनही मलाच खाते ॥ २ ॥

आहारि विकारांच्या, वेगात ह्रदय जाते ।
म्हणती कधी कुणाला, टळले न कर्म-जाते ॥ ३ ॥

सध्दर्ममय नदीत, दुनिया जरी नहाते ।
तीतून बिंदु एक, मी घेतले न हाते ॥ ४ ॥

प्राची दिशा क्षमेचे, मंजूळ गीत गाते ।
तप, त्याग संयमाची, भरूनी नदी वहाते ॥ ५ ॥

अध्यात्म सूर्य बिंब, दारी तुझ्या रहाते ।
निजरुप दाखवून, निजरुपही पहाते ॥ ६ ॥

स्वातंत्र्य सूर्य उगवो, नाशून पर तमाते ।
पर्वास प्रार्थना ही, दे आत्मशांति माते ॥ ७ ॥

(३)

पर्वा तुझी मला रे, परवा न अंतरी ही ।
गर्जून घोष केला, गरजू न मी तरी ही ॥ १ ॥

दिव्य क्षमादि सूर, नित ऐकतो तरी ही ।
बहिरा भवामुळे मी, कटू सत्य एक हे ही ॥ २ ॥

बोटास कर्म धरिते, फिरवी तसाच फिरतो ।
मी बोट विकारांचे भीतीमुळेच धरतो ॥ ३ ॥

वाटे वरील काटे, टोचू नयेत वाटे ।
वाटील आसवांना, जाता सुखांत कोठे ॥ ४ ॥

कांही असो परंतू, चुकलो असेन मी ही ।
मी शुध्द सिध्द आहे, मज वाटले तरी ही ॥ ५ ॥

कळले तुझ्यामुळे जे निजरुप सुस्वरुप ।
होऊ नये कधी रे, ढळता क्षणी कुरुप ॥ ६ ॥

(४)

वंदून आगमाला, घालून धर्ममाला ।
सांगेन अंतराला, पर्वा तुझी कहाणी ॥ १ ॥

संसार अग्निकूप, वन सिंधु काळरुप ।
आनंद देई खूप, पर्वा तुझी कहाणी ॥ २ ॥

चैतन्य अर्पिणार, सर्वांस तूच प्यारा ।
सामर्थ्य शांतिधारा, पर्वा तुझी कहाणी

मी सांगतो जगाला, हे सत्य मात्र एक ।
आम्हास वेळ नाही, करितो किती बहाणी ॥ ३ ॥

पाळा क्षमादि धर्म, इतरास सांगतो मी ।
माझ्याच अंतरीची, केली कधी पहाणी ॥ ४ ॥

आत्मा सदैव शुध्द, स्थिर त्यातची रहावे ।
पण सोडणार केव्हा, इथली भडक रहाणी ॥ ५ ॥

ग्रंथ ऋषी मुनींनी, लिहले असेल यत्ने ।
तेरा हुद्या मी म्हणतो, डोकी आता शहाणी ॥ ६ ॥

घडले घडून गेले, आता मला कळाले ।
सन्मार्ग दाखवील, पर्वा तुझी कहाणी ॥ ७ ॥

( महावीरांची आरती )

आरती श्री महावीर स्वामी की

ॐ जय महावीर प्रभो, स्वामी । जय महावीर प्रभो ।
कुण्डलपूर अवतारी, त्रिशलानंद विभो । ॐ जय महावीर प्रभो

सिध्दारथ घर जन्मे, वैभव था भारी, स्वामी वैभव था भारी ।
बाल ब्रम्हचारी व्रत, पाल्यो तपधारी । ॐ जय महावीर प्रभो ।

आत्म ज्ञान विरागी, समदृष्टी धारी ।
माया मोह विनाशक, ज्ञान ज्योति जारी । ॐ जय महावीर प्रभो ।

जग मे पाठ अहिंसा, आप ही विस्तारयो ।
हिंसा पाप मिटाकर सुधर्म परिचार्यो । ॐ जय महावीर प्रभो ।

यहि विधि चांदनपुर मे, अतिशय दर्शायो ।

ग्वाल मनोरथ पूऱ्यो, दूध गाय पायो । ॐ जय महावीर प्रभो ।

प्राणदान मंत्री को, तुमने प्रभु दीना ।

मंदिर तीन शिखर का निर्मित है कीना । ॐ जय महावीर प्रभो ।

जयपूर नृप भी तेरे, अतिशय केसेवी ।

एक ग्राम तिन दोनों, सेवा हित यह भी । ॐ जय महावीर प्रभो ।

जो कोई तेरे चरण पर, इच्छा कर आवै ।

धन सुत सब कुछ पावै, संकट मिट जावै । ॐ जय महावीर प्रभो ।

निश दिन प्रभु मंदिर में जगमग ज्योति जरै ।

हरि प्रसाद चरणों में आनंद मोद भरै । ॐ जय महावीर प्रभो ।

++++

( अथ परमानन्दस्तोत्रम् )

परमानन्दसंयुक्तं, निर्विकारं निरामय् ।

ध्यानहीना न पश्यन्ती, निजदेहे व्यवस्थितम् ॥१ ॥

अनंतसुखसंपन्नं ज्ञानामृतपयोधरम् ।

अनंतवीर्यसंपन्नं, दर्शनं परमात्मनः ॥ २ ॥

निर्विकार निराबाधं सर्वसंगविवर्जितम् ।

उत्तमानन्दसंपन्नं शुध्दचैतन्यलक्षणम् ॥ ३ ॥

उत्तमा स्वात्मचिन्ता स्यात् देहचिन्ता च मध्यमा ।
अधमा काम चिन्ता स्यात् पर चिन्ताधमाधमा ॥ ४ ॥
निर्विकल्पसमुत्पन्नं ज्ञानमेव सुधारसं ।
विवेकमंजलि कृत्वा तं पिबन्ति तपस्विन: ॥ ५ ॥
सदानंदमयं जीवं, यो जानाति स पंडित : ।
ससेवते निजात्मानं, परमानन्दकारणम् ॥ ६ ॥
नलिनाच्च यथा नीरं भिन्नं तिष्ठति सर्वदा ।
सोऽयमात्मा स्वभवेन, देहे तिष्ठति निर्मल: ॥ ७ ॥
द्रव्यकर्ममलैर्मुक्तं, भावकर्मविवर्जितम् ।
नोकर्मरहितं सिध्दं निश्चयेन चिदात्मकम् ॥ ८॥
आनंद ब्रम्हणो रुपं निजदेहे व्यवस्थितम् ।
ध्यानहीना न पश्यन्ति जात्यंधा इव भास्करम् ॥ ९ ॥
सद्ध्यानं क्रियते भव्यैर्मनो येन विलीयते ।
तत्क्षणं दृश्यते शुध्दं चिच्चमत्कारलक्षणम् ॥ १० ॥

ये ध्यानलीना मुनय: प्रधना: ।
ते दु:खहीना नियमाद्भवन्ति ॥
सम्प्राप्य शीघ्ं्र परमात्मतत्वं ।
व्रजनित मोक्षं क्षणमेकमेव ॥
आनंदरुपं परमात्मतत्वं ।
समस्तसंकल्पविकल्पमुक्तम् ॥ ११ ॥
स्वभावलीना निवसन्ती नित्यं, ।
जानाति योगि स्वयमेंव तत्वं ॥ १२ ॥

निजाननदमयं शुध्दं निराकारं निरामयम् ।
अनंतसुखसंपन्नम्, सर्वसंगविवर्जितम् ॥ १३ ॥

लोकमात्रप्रमाणोऽयम्, निश्चयेन न संशय: ।
व्यवहारे तनुमात्र:, कथित: परमेश्वरै: ॥ १४ ॥
तत्क्षणं दृश्यते शुध्दम्, तत्क्षणं गतविभ्रम: ।
स्वस्थचित्त: स्थिरीभूत्वा निर्विकल्पसमाधित: ॥ १५ ॥
स एव परमं ब्रम्ह स एव जिनपुंगव: ।
स एव परमं तत्त्वं, स एव परमो गुरु: ॥ १६ ॥
स एव परमं ज्योति:, स एव परमं तप: ।
स एव परमं ध्यानं, स एव परमात्मक: ॥ १७ ॥
स एव सर्वकलयाणं, स एव सुखभजनम् ।
स एव शुध्दचिद्रुप:, स एव परमं शिव: ॥ १८ ॥
स एव परमानंद:, स एव सुखदायक: ।
स एव परमाज्ञानं, सव एव गुणसागर: ॥१९ ॥
परमाल्हादसंपन्नं रागद्वेषविवर्जितम् ।
सोऽहं तं देहमध्येषुं यो जानाति स पंडित: ॥ २० ॥
आकाररहितं, शुध्दं, स्वरुपे व्यवस्थितम् ।
सिध्दमष्टगुणोपेतं निर्विकारं निरंजनम् ॥ २१ ॥
तत्सद्दर्शनं निजात्मानं, यो जानाति स पंडित: ।
सहजानंदचैतन्यप्रकाशाय महीयसे ॥ २२ ॥
पाषाणेषु यथा हेम, दुग्धमध्ये यथा घृतम् ।
तिलमध्ये यथा तैलं, देहमध्ये यथा शिव: ॥ २३॥
काष्ठमध्ये यथा अग्नि शक्तिरुपेण तिष्ठति ।
अयमात्मा शरीरेषु, यो जानाति स पंडित: ॥ २४॥

++++

( दशलक्षणधर्म अरती )

जय जय दशविध धर्मा । तुझि आरती करु सुखशर्मा ॥
जय जय मंगलकर्मा । जय जय भववारणवर्मा ॥ धृ. ॥

मुनिजनमानसहारी । धरी एक क्षमा सुखकारी ॥
शुभ मार्दव धर्मविशाला । करि जीवदया प्रतिपाळा ॥ १ ॥

शुभ आर्जव धर्म करावे । रिपु सज्जन एक भजावे ॥
वद सत्यचि वाक्य रसाळा । सुख विकसित परम रसाळा ॥ २ ॥

तजि मानस कुटिलमलाते । मुनि बोलति शौच तयाते ॥
संयम दोनि मुनीसी । करि पालन भाआविक त्यासी ॥ ३ ॥

तप द्वादश आचार भूपा । भवसागर होईल सोपा ॥
करि आहारदान मुनीसी । वर औषध अभय श्रुतीसी ॥ ४ ॥

दशविध परिग्रह लोकी । करि आकिंचन्य विवेकी ।
तज परनारि कुसंग । धरि शीलव्रतासि अभंग ॥ ५ ॥

जो श्रावक करिल व्रतासी । सुख संपत्ति होईल त्यासी ॥
सुरपतिकीर्तिपदाला । जिनसागरपावल त्याला ॥ ६ ॥

++++

( वीतराग आरती )

वीतराग जिन । दीपार्चन हे,
मंगल तव चरणी, अर्पण तव चरणीं ।

शांतीसुधेच्या मधुरा स्वादा, देते दिनरजनी ॥ धृ. ॥

अगण्य गुणगणप्रभा जीवांच्या,

नशवि मोहाते, ज्ञानामृत देते ।

सकल जीवांते शिवपुरमार्गा, प्रेमे दर्शविते ॥ १ ॥

शुभ भवांची ज्योत तेवूनी, भक्तिरुपी धृत ते ॥ भक्ति ॥

ओतुनि प्रमेकरिता आरती, स्वगुणा प्रगटविते ॥ २ ॥

✦✦✦✦✦

( चोवीस जिनेश्वर आरती )

आरती करु चोवीस जिनेश्वर, आरती करु या या ।

पहिले नमन कैलास गिरीवर, आदिनाथ भगवंत जिनेश्वर ॥

दुसरे नमन सम्मेद गिरीवर, वीस नाथ भगवंत जिनेश्वर ।

तिसरे नमन चंपापुरीवर, वासूपूज्य भगवंत जिनेश्वर ॥ आ ॥

चवथे नमन गिरनारीवर नेमिनाथ भगवंत जिनेश्वर ॥ आ ॥

पंचम नमन पावापुरीवर, महावीर भगवंत जिनेश्वर ॥ आ ॥

( पंच परमेष्ठी आरती )

यहविधी मंगल आरती कीजे ।

पंच परमपद भज सुख लीजे ॥ टेक. ॥

पहली आरती श्रीजिनराया ।

भवी दधिपर उतार जिहाजा ॥ १ ॥

दुसरी आरती सिध्दनकेरी ।
सुमरन करत मिटे भवफेरी ॥ २ ॥

तिसरी आरती सूर मुनिंदा ।
जनम मरन-दुख दूर करिंदा ॥ ३ ॥

चौथी आरती श्री उवझाया ।
दर्शन देखत पाप पलाया ॥ ४ ॥

पंचमी आरती साधु तुम्हारी ।
कुमती विनाशन शिव अधिकारी ॥ ५ ॥

छट्टी ग्यारह प्रतिमा धारी ।
श्रावक वंदो आनंदकारी ॥ ६ ॥

सातमि आरती श्री जिनवाणी ।
द्यानत सुरग मुकति सुखदानी ॥ ७ ॥

( महावीर आरती )

आरती श्रीजिन वीर तुम्हारी ।
सौख्यकरण भव-दु:ख निवारी ॥ आ. ॥

पहली आरती गर्भ आवतारी।

सेवत इंद्र सवे नरनारी ॥ आ. ॥ १ ॥

दुसरी आरती जनम भयो है,

इंद्र- शतक मिल उत्सवकारी ॥ आ. ॥ २ ॥

तिसरी आरती तपव्रतधारी,

भयो दिगंबर चारित्रधारी ॥ आ. ॥ ३ ॥

चौथी आरती केवलाज्ञानी,

समवसरण जिन दिव्य सुवाणी ॥ आ. ॥ ४ ॥

इंद्र करी पूजा अष्टप्रकारी,

चौसठ चामर सिरपर ढारी ॥ आ. ॥ ५ ॥

पंचमआरती शिवपदधारी,

रावकगण सब आत्मविचारी ॥ आ. ॥ ६ ॥

## पंचमेरुची आरती

(चाल - टिपऱ्यांची)

मेरुना दीप करवा, आवो रे नार तमे केम भूली गाय

सोनाना थालीमा नीलाना दिपक,

करीम केन नथी आवो रे नार तमे केम भूली गया ॥ १ ॥

क्षीर समुद्रना जल मंगाओ, कलश कलश थकी,
आवो रे नार तमे केम भूली गया ॥ २ ॥

इंद्र दंद्रानी जेवू थाटमाटथी,
मधूर गीत गावा आवो रे नार तमे केम भूली गया ॥ ३ ॥

अष्टद्रव्याने पूजा करीने,
मेरुना गाल करवा आवो रे नार तमे केन भूली गया ॥ ४ ॥

सर्वांना हाथमा आरती आपिने गाजा बाजाने थकी
आवो रे नार तमे केम भूली गया ॥ ५ ॥

दध्युज्वलाक्षत - मनोहर - पुष्पदीपे ।
पात्रर्पितं प्रतिदिनं महतादरेण ॥
त्रैलोकय - मंगल - सुखनल - कामदाहा ॥
मारार्तिकां तर विभोरतारयामि ॥ आरती ॥

## सिध्द व नंदीश्वर आरती

आरती करुया मिळूनी प्रभू सिध्द जिनांची ।
करुया मंगल आरती प्रभू नंदीश्वराची ॥ धृ ॥

मैनासुंदरी होती एक सुंदर स्वरुप राणी,

परतु दु:खी असे नेहमी पति कोडी पाहूनी ।

दिनरात राणीला चैन नसे हो ।

मनी चिंता ती भारी असे हो

कुष्ठ रोग हा कैसा जाईल, पति सेवेमध्ये तल्लिन ॥ १ ॥

उदयकाळ तो ऐसा आला पर्व अष्टानिहक त्यासमयी

मंदिरामध्ये प्रवेश केला मैना सुंदरी राणीने,

तिथे मुनी दिगंबर ज्ञानी होते,

पाहूनी राणीला हर्ष जहाला,

त्रिवार नमस्कार करोनिया मुनीसमोरी बैसली ॥ २ ॥

सिध्दचक्राचा महिमा ऐकूनी राणीने व्रत घेतले,

मन, वच, तन एकाग्र करोनी विधीसहितही केले,

गंधोदक धऊन राजाला लावीले,

रध्देने राणीने कर्माला जिंकले,

कुष्ठ रोग हा नाहिसा झला सिध्दचक्राच्या महिमाने ॥ ३ ॥

## मंगल आरती

(पंडित श्री. द्यानतरायजी कृत)

मंगल आरती आतमराम

तन मंदिर मन उत्तम ठाम

समरस जल चन्दन आनंद
तन्दुल तत्त्वस्वरुप आमंद ॥ १ ॥

समयसार फूलन की माल
अनुभव सुख नेवज धरि थाल

दीपक ज्ञान ध्यान की धूप
निर्मल भाव महाफल रुप ॥ २ ॥

सुगुण भविकजन इकरंग लीन
निहचै नवधा भक्ति प्रवीण

धुनि उत्साह सुअनहद गान
परम समाधि निरत परिधान ॥ ३ ॥

बाहिज आतम भाव बहावै
अन्तर है परमातम ध्यावे

साहब-सेवक भेद मिटाय
द्यानत एकमेव ही जाय ॥ ४ ॥

## सोळाकरण आरती

जय सोलहकारणयंत्र संसृतिसंहारमंत्रं ॥
आरती करु अघहंत्रं, महमायावेलडितंत्रं ॥ धृ ॥

दार्शनशुध्दि विशाल, विनयस्थिति परमरसाला।
शीलव्रतगुणमाला, शुभनामयोग परिकाला॥ जय॥ १॥

वर संवेगाते धरिजे, विधिपूर्वक वितरण कीजे।
द्वादशविध तप लीजे, शुभ साधुसमाधि लहीजे॥ जय०॥ २॥

वैयावृत्य करंता, ह्दि भाव धरी भगवंता।
भक्ति करी गुरु संत, बहुशास्त्र भक्ति झमकंता॥ जय०॥ ३॥

आगमरुप अनुपा करि आवश्यक मुनिभूपा।
मार्गप्रभावनरुपा, प्रवचनवत्सलरसकूपा॥ जय०॥ ४ १।

षोडशजिनवरनामा, मनिं भावे मानव रामा।
देवंद्रकीर्तिपदकामा अनुपावे अविचल ठामा॥ जय०॥ ५॥

भजन

आज हम जिनराज तुम्हारे द्वारे आये॥

हाँ जी हां हम आये आये ..........
देखे देव जगत के सारे, एक नही मन भावे ..........

पुण्य उदय से, आज तिहारे ..........
दर्शन कर सुख पाये .......... आज हम ..........

जनम मरण नित करते करते, काल अननत गमाये।
अब तो स्वामी जन्म मरण का ..........

दुखडा सहा नही जाय .......... आज हम ..........
भव सागर में नाव हमारी, कब से गोता खाये ..........

तुम ही स्वामी हाथ बढाकर ..........
तारो तो तिर जाये .......... आज हम ..........

अनुकम्पा हो जाय आपकी आकुलता मिट जाये
पंकज की प्रभु यही विनंती ..........

चरण शरण मिल जाये ..........
आज हम जिनराज तुम्हारे द्वारे आये ..........

## श्री भगवान पार्श्वनाथ की स्तुती

तुमसे लागी लगन, ले लो अपनी शरण।
पारस प्यारा, मेटो मेटो जी संकट हमारा। टेक।

निश दिन तुझको जपू, परसे नेंहा तजू।
जीवन सारा, तेरे चरणं में बीते हमारा॥ १॥

अश्वसेन केराजदुलारे, वामादेवी केसुत प्राण प्यारे।
सबसे नेंहा तोडा, जगसे मंहको मोडा संयम धारा॥ २॥

इन्द्र और धरणेन्द्र भी आये, देवी पद्मावती मंगल गाये।
आश पूरो सदा, दु:ख नहीं पावे कदा, सेवक थारा ॥ ३ ॥

जगके दु:ख की तो परवा नहीं हैं, स्वर्ग-सुखकी भी चाह नही है
मेटो जामन-मरण, होवे ऐससा यतन, पारस प्यारा ॥ ४ ॥

लाखें बार तुम्हें शीश नवाऊँ, जगके नाथ तुम्हे कैसे पाऊँ।
पंकज व्याकुल भया, दर्शन बिन ये जिया, लागे खारा ॥ ५ ॥

## आत्म - दर्शन

मी चिनमूरति आतमराम, चिदानंदमय मी अभिराम।
अविनाशी अविचल निष्काम, शक्ति अमित सुखमय
मम धाम ॥ धृ ॥

ज्ञाता द्रष्टा, त्रिभुवन भूप, तोच निरजन मी चिद्रूपः
परमानंद अनादि निधान; शुध्द सदा मी सिध्दा समान ॥ १ ॥

संपद आपद सुखदुख भाव; संयोगे हे सर्व विभाव;
राग-रोष नच आत्मस्वभाव; वीतराग शुध्द स्वभाव ॥ २ ॥

मोह-भ्रांती वश मी विनभन, विसरुनि माझे परम निधान
चिरसुख शोधित पर आधीन,फिरली वनवन होऊनि दीन ॥ ३ ॥

भवकर्म पर-आश्रित जाण, द्रव्यकर्म तन जड अज्ञान,
परद्रव्याशी नच मम काम, स्वतंत्र, निर्मल आतमराम ॥ ४ ॥

जगपरिणति ही सदा स्वतंत्र, कोणि कुणाचे फिरवि न तंत्र
व्यर्थ-मोह-भ्रम पर-परिणाम, शुध्द निरंजन मी निष्काम ॥ ५ ॥

माझे सुखदुख मम आधीन, कर्म बापडे
सोड राग, सुख इथेच जाण; वीतराग प्रभू, मी भगवान ॥ ६ ॥

वीतरागजिन जो भगवान, भिन्न नसे मी त्याहून जाण,
जो तो, तो मी एकस्वरुप, स्वतंत्र निश्चल ब्रम्हस्वरुप ॥ ७ ॥